International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# भारतातील मानव संसाधनाची आर्थिक विकासातील भूमिका व आव्हाने

**प्रा. डॉ. एस. एस. राठोड**
*श्री शहाजी छ. महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर.*
*Corresponding Author – प्रा. डॉ. एस. एस. राठोड*
**DOI - 10.5281/zenodo.18491064**

**प्रस्तावना:**

मानवी विकासाची संकल्पना 1990 मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) ने मांडली. यामध्ये लोकांच्या स्वातंत्र्याचा आणि क्षमतांचा विस्तार करण्यावर भर देण्यात आला. मानवी विकासामध्ये आरोग्य, शिक्षण आणि राहणीमान घटक महत्त्वाचे आहेत. आरोग्यसेवेची ग्रामीण आणि शहरी भागामध्ये तफावत आहे. शासकीय योजना आहेत, परंतू त्याची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होत नसल्याने आजही मुले आणि महिला यांच्यामध्ये कुपोषण आढळते. तसेच असंसर्गजन्य आजारांचे प्रमाणही वाढत आहे. लोकसंख्येच्या तुलनेमध्ये सार्वजनिक आरोग्याच्या मूलभूत सुविधा, रुग्णालये, वैद्यकीय कर्मचारी आणि उपकरणांची कमतरता आढळते. शैक्षणिक गुणवत्तेच्या बाबतीत उच्च नोंदणी दर असूनही शैक्षणिक निकाल कमी दर्जाचे आहेत. आजही लिंग असमानता असल्याने मुलींना शैक्षणिक अडथळयांचा सामना करावा लागतो. विशेषतः ग्रामीण भागातील मुलींना याची अधिक झळ पोहोचते. उत्पन्नातील असमानतेमुळे राहणीमानावर परिणाम होताना दिसतो. एकीकडे शिक्षणाचे प्रमाण वाढत असूनही तरुणांच्यामध्ये बेकारी अधिक आहे. गरजू लोकांच्या मानाने गृहनिर्माण आणि स्वच्छता सुविधाची कमतरता आढळते. असे असले तरी आज यामध्ये सुधारणा होत असताना आढळते.

**उद्दिष्ट्ये:**

- मानव संसाधन विकासाची सद्यस्थिती अभ्यासणे.
- मानव संसाधन विकासातील शासनाची भूमिका अभ्यासणे.
- आर्थिक विकासातील मानव संसाधनाची भूमिका अभ्यासणे.

**गृहीतके:**

- मानव संसाधन विकासाकरिता शासकीय प्रयत्न अपुरे पडतात.
- मानवी विकासातील अडथळे दूर केल्याशिवाय विकास होणे अशक्य.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंध दुय्यम तथ्य संकलन सामग्रीवर आधारित आहे. यामध्ये संदर्भग्रंथ, नियतकालिके, मासिक व इंटरनेटच्या सहाय्याने वस्तुस्थितीच्या आधारे माहितीचे संकलन केले आहे.

**ऐतिहासिक पार्श्वभूमी:**

मानव संसाधन विकासाची पार्श्वभूमी पाहता 1975 मध्ये एल ॲन्ड टी मध्ये पहिला मानव संसाधन विभाग सुरू केला. पुढे 1977 मध्ये कार्यास सुरुवात झाली तर 1983

मध्ये मानव संसाधन विकासासाठी एक्स एल आर आय केंद्र सुरू झाले. त्यानंतर 1986 मध्ये राष्ट्रीय मानव संसाधन विकास नेटवर्क (NHRDN) आणि 1990 मध्ये मानव संसाधन विकास आकादमी (AHRD) यांच्या विविध कार्य करणाऱ्या घटकांच्यापासून मानव संसाधन विकास कार्याची सुरुवात झाल्याचे आढळते. 1969 मध्ये अमेरिकन सोसायटी फॉर ट्रेनिंग ॲन्ड डेव्हलपमेंट ने आयोजित केलेल्या परिषदेमध्ये लिओनाई नॅडलर यांनी मानव संसाधन विकासाची संकल्पना मांडली. त्यांच्या मते विशिष्ट वेळेसाठी आयोजित केलेले आणि वर्तनात्मक बदल घडवून आणण्यासाठी डिझाईन केलेले असे शिक्षण अनुभव अशा अर्थाची संकल्पना मांडली.

मानव संसाधन विकासामुळे कर्मचाऱ्यांना भविष्यकालीन वाटचालीमध्ये आवश्यक ती पात्रता, पद, निर्माण करण्यास मदत होते. नेतृत्व, कौशल्य, दृष्टिकोन आणि ज्ञान विकसित होते. याबरोबरच लोकांच्यामधील क्षमता व कमकुवतपणा ओळखण्यासही मदत होते. जेणेकरून एखाद्या कंपनीला, उद्योगाला यशस्वीपणे नियोजन करण्याचे धोरण आखता येते.

अलिकडे मानव संसाधन विकास ही संकल्पना व्यापक होत आहे. ही एक अशी पद्धत आहे की, ज्यामध्ये सर्व पातळीवरील काम करणाऱ्या लोकांना योग्य काम देण्यासाठी आणि त्यांच्या क्षमतेचा पुरेपूर वापर करण्यासाठी नियोजनबद्ध कृती केली जाते. आधुनिक लोक कल्याणकारी राज्याचे तत्त्वज्ञान, विचार आणि प्रयत्न मानवाच्या सर्वांगीण विकासासाठी मानव संसाधन विकास गरजेचा आहे.

**आर्थिक विकासातील मानव संसाधनाची भूमिका:**

विकासाकडे वाटचाल करत असताना भारतासारख्या अधिक लोकसंख्या असणाऱ्या अर्थव्यवस्थेला विकसित देशाच्या यादीत स्थान मिळविण्यासाठी मानव संसाधन विकास करणे अत्यंत गरजेचे आहे. जागतिक पातळीवर विचार करता भारतात तरुण वर्गाची अर्थात कष्टकरी वर्गाची संख्या अधिक आहे. त्यामुळे मानव संसाधन विकासाकरिता योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. मानव संसाधन विकास महत्त्वपूर्ण घटकाच्या करिता महत्त्वाचा आहे.

**मानवी भांडवल निर्मितीस उत्तेजन**:

शिक्षणातून आणि कौशल्यातून लोकसंख्येला सक्षम करणे. सामाजिक परिवर्तन करणे आणि देशाच्या विकासास हातभार लावण्यासाठी मानवी भांडवल महत्त्वाचे आहे. त्यामुळे कुटुंबाचा, समाजाचा पर्यायाने देशाचा विकास होण्यास मदत होते.

**संस्थांची संपत्ती म्हणजे मानव:**

विविध क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या संस्थांचा जर विकास करावयाचा असेल तर या क्षेत्रामध्ये कार्यरत असणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्याला संबंधित संस्थेची मौल्यवान अशी संपत्ती आहे, असे मानले तर आणि त्यांच्या क्षमतेनुसार परिवर्तन घडवून आणण्यासाठी मानव संसाधन विकास महत्वाचा आहे.

**आर्थिक विकासास उत्तेजन देणे**:

मानव संसाधन विकासाकरिता शैक्षणिक गुंतवणूक केल्यास आर्थिक विकासाला चालना मिळते. शिक्षणामुळे उत्पादनक्षमता वाढते. मानवी ज्ञानाचा आणि कौशल्याचा विकास होतो. यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते.

**बदलत्या गरजांशी जुळवून घेणे शक्य होते:**

अलिकडील बदलत्या गतीमान परिस्थितीचा विचार करता दिवसेंदिवस माहिती तंत्रज्ञानामध्ये झपाट्याने बदल होत आहेत. या बदलांना सामोरे जाण्यासाठी नवनवीन बदल आत्मसात करण्यासाठी आणि कर्मचाऱ्यांमध्ये

कार्यक्षमता निर्माण करण्यासाठी मानव संसाधन विकास महत्त्वाचा आहे.

**मागासलेपणा नाहीसे करणे शक्य होते:**

देशातील आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणाचा दर कमी करण्यासाठी मानवी संसाधनाची भूमिका महत्त्वाची ठरते. शैक्षणिक तरतूद वाढविल्यास साक्षरतेचे प्रमाण वाढते. सुशिक्षितांचे प्रमाण वाढते. शिक्षणामुळे अधिक कुशल मनुष्यबळ निर्माण होते. तसेच आरोग्याच्या वाढत्या सुविधामुळे मानवी संसाधनाचा दर्जा उंचावतो. आरोग्य सुधारुन कार्यक्षमता वाढते. त्यामुळे उत्पन्न वाढते. परिणामी आर्थिक आणि सामाजिक मागासलेपणा दूर होतो.

**आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते:**

बहुतेक सर्व देशामध्ये शिक्षणाविषयीचे सर्वव्यापी धोरण राबविले जाते. शिक्षणामुळे सर्वांना समान लेखनाचा, स्वतंत्र विचाराचा दृष्टिकोण निर्माण होतो. तसेच शिक्षण प्रसारातून गरीबांना आर्थिक लाभ होतो. सर्वसमावेशक शिक्षणामुळे मानवी संसाधनाचा विकास होवून श्रीमंत व गरीब वर्गातील उत्पन्नातील तफावत कमी होवून आर्थिक विषमता कमी होण्यास मदत होते.

**नैसर्गिक संसाधनाचा पर्याप्त वापर शक्य:**

कुशल व दर्जेदार श्रमशक्तीमुळे दुर्मिळ असणाऱ्या नैसर्गिक साधनांचा योग्य पद्धतीने वापर करणे शक्य होते. जेणेकरून नैसर्गिक साधनांचा अपव्यय टाळणे शक्य होते. तसेच भांडवल व तंत्रज्ञानाचाही कार्यक्षम वापर होऊन देशाच्या आर्थिक विकासास मदत होते. त्यामुळे मानवी संसाधने नैसर्गिक साधन संपत्तीचा पर्याप्त वापर करण्यास उपयुक्त ठरतात.

**नवप्रवर्तन व उद्योजकता वाढीस मदत:**

तत्त्वज्ञान विकासासाठी मानवी भांडवलाची भूमिका महत्त्वाची ठरते. मानवी संसाधनामुळे ज्ञान, विज्ञान व तंत्रज्ञान विकास होतो. शेती, उद्योग, व्यापार, वाहतूक, दळणवळण या सर्वच क्षेत्रात तंत्रज्ञान वापरास प्रेरणा मिळते. त्यामुळे आर्थिक विकासाची गती वाढते.

**ग्रामीण विकासास योगदान:**

मानवी संसाधनामुळे ग्रामीण भागातील लोकांच्या ज्ञानात वाढ होवून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा वापर वाढतो. कौशल्य विकासातून शेतीपूरक उद्योगामध्ये वाढ होते. त्यामुळे ग्रामीण भागातील कुटुंबाचे राहणीमान सुधारते. त्यामुळे शिक्षण, आरोग्य, पोषणक्षमता इत्यादीमध्ये सकारात्मक बदल होऊन रोजगार संधीमध्ये वाढ होवून ग्रामीण भागाच्या विकासास चालना मिळते.

**मानव संसाधन विकासाची सद्यस्थिती:**

मानव संसाधन विकासाची सद्यस्थितीच्या अनुषंगाने काही महत्त्वाचे घटक विचारात घ्यावे लागतात.

**कर्मचारी केंद्रित दृष्टीकोन:**

कार्यरत असणाऱ्या संस्था, कंपन्या या कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना मौल्यवान संपत्ती मानतात. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या विकासासाठी गुंतवणूक केल्यास त्यांची कामाबद्दलची निष्ठा वाढते आणि उत्तम कर्मचारी तयार होण्यास मदत होत आहे.

**तंत्रज्ञानाचा प्रभाव:**

अलिकडील डिजीटल युगामध्ये ऑनलाईन प्रशिक्षण, कार्यक्षम व्यवस्थापन आणि कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर वाढत आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मानवी संसाधन विकसित होण्यास मदत होत आहे.

**कौशल्य विकास:**

बदलणाऱ्या तंत्रज्ञानामुळे कर्मचाऱ्यांच्या कौशल्यामध्ये वाढ करणे आणि नवनवीन कौशल्य आत्मसात करणे काळाची गरज बनली आहे. त्यामुळे मानव संसाधन विकास करणे शक्य होत आहे.

**लोकसंख्याशास्त्रीय लाभांश:**

भारतासारख्या अधिक लोकसंख्येच्या देशामध्ये तरुण आणि कार्यक्षम लोकसंख्येमुळे आर्थिक विकासाला चालना मिळत आहे. असे असले तरी या लोकसंख्येला योग्य शिक्षण आणि कौशल्य देणे गरजेचे आहे.

**भारतातील मानव संसाधन विकास आणि शासकीय प्रयत्न:**

भारताचे विकास मॉडेल हे बहुआयामी वंचितांचे निराकरण करण्यासाठी कल्याणकारी आणि हक्क यावर आधारित योजनावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. या उपक्रमा अंतर्गत सामाजिक सुरक्षा, आरोग्य, पोषकता, डिजीटल सक्षमीकरण आणि लिंग समानता इत्यादीचा समावेश होतो. या माध्यमातून भारतातील मानवी विकास करण्यासाठी शासकीय पातळीवर पुढील काही उपक्रम राबविले जातात.

**आरोग्यविषयक उपक्रम अंतर्गत:**

- आयुष्यमान भारत **(PMJAY)** - यानुसार आरोग्य विमा कार्यक्रम राबविला जातो. संबंधित कुटुंबास 5 लाख रुपये इतकी रक्कम दिली जाते.
- आरोग्य आणि कल्याण केंद्रे **(HWCS)** - या केंद्राच्या माध्यमातून प्राथमिक आरोग्य सेवांचा विस्तार करणेसाठी अशा केंद्रांची संख्या वाढविण्यावर भर दिला जातो आहे.
- राष्ट्रीय आरोग्य अभियान **(NAM)** - यामध्ये माता, नवजात शिशु आणि बाल आरोग्यावर लक्ष केंद्रित केले जाते. जेणेकरून माता व बालकाचे आरोग्य सुधारण्यावर भर दिला जातो.
- मिशन इंद्रधनुष्य - या अंतर्गत सार्वजनिक लसीकरणाची मोहिम राबविली जाते आणि ही मोहीम सर्वसमावेशक कशी होईल याकडे अधिक लक्ष दिले जाते.

शैक्षणिक उपक्रम**:**

- समग्र शिक्षा अभियान - या उपक्रमा अंतर्गत शालेय पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात आणि या सुविधा अधिक दर्जेदार कशा होतील यावर भर दिला जातो.
- राष्ट्रीय शिक्षणधोरण **2020** - शालेय विद्यार्थ्यांच्यासाठी आधुनिकीकरण, लवचिकता, बहुउद्देशीय शालेय दृष्टिकोन विचारात घेऊन हे धोरण राबविले जात आहे.
- पी. एम. पोषण **(Miday Meal)** - या अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी पोषणक्षम आहाराची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. याचा लाभ अधिक अधिक विद्यार्थ्यांना मिळत आहे.
- शिक्षण हक्क कायदा **(RTE) 2009** - या उपक्रमाअंतर्गत 6 ते 14 वयोगटातील मुलांच्यासाठी मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याची हमी दिली आहे.

**पोषण आणि सामाजिक संरक्षण**:

- आयसीडीएस - अंतर्गत माता, बालक, पोषण आणि बालकांची काळजी घेतली जाते.
- मनरेगा - यानुसार वेतन सुरक्षा सुनिश्चित करणारा सर्वात मोठा ग्रामीण रोजगार कार्यक्रम राबविला जातो.
- एनएफएसए **(NFSA)** - या योजनेअंतर्गत गरजू लोकांना अन्नधान्याच्या रुपात मदत केली जाते. आत्तापर्यंत 81.35 कोटी गरजूंना अन्नधान्य पुरविले आहे.

**गृहनिर्माण, स्वच्छता आणि आर्थिक समावेशन :**

- पंतप्रधान आवास योजना - या अंतर्गत ग्रामीण आणि शहरी भागातील गरीबांच्यासाठी त्यांना परवडणारी अशी घरे उपलब्ध करून दिली जातात.
- स्वच्छ भारत अभियान - या अंतर्गत 11 कोटी शौचालय उपलब्ध केली असून स्वच्छता अभियानाला यश प्राप्त झाले आहे.
- पंतप्रधान जनधन योजना - या अंतर्गत 51 कोटी पेक्षा अधिक बँक धारकांना आर्थिक व्यवहाराशी बँक खात्यांची उपलब्धता झाली आहे.

**भारतातील मानव संसाधन विकाससमोरील आव्हाने:**

- शिक्षण व कौशल्य विकासामधील दोष - आजही मोठ्या तरुण वर्गाला शैक्षणिक सुविधा उपलब्ध असूनही विद्यार्थ्यांना नोकरीसाठी आवश्यक व्यावहारिक कौशल्य शिकविले जात नाहीत. ज्यामुळे बेकारी वाढते व मनुष्यबळ कमकुवत राहते.
- गरिबी आणि संसाधनाची कमतरता - भारतातील मोठ्या लोकसंख्येचा अन्न, वस्त्र, निवारा आणि आरोग्यसेवा मिळत नाहीत. जेणेकरून त्याची कार्यक्षमता कमी राहते.
- आरोग्य आणि पोषणाचा अभाव - अजूनही गरजेच्या तुलनेने अपुऱ्या आरोग्य सुविधा, स्वच्छता आणि पोषणाच्या समस्येमुळे मनुष्यबळाचे आरोग्य खालावत आहे आणि त्यामुळे उत्पादन क्षमता घटते आहे.
- प्रादेशिक विषमता - शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेमध्ये राज्या-राज्यामध्ये मोठी तफावत आहे. त्यामुळे काही राज्ये मागे पडतात. ही विषमता कमी करणे आव्हान आहे.
- बेरोजगारी आणि अपुरी रोजगार निर्मिती - भारतात कुशल मनुष्यबळाची उपलब्धता असूनही त्यांना योग्य रोजगार मिळत नाही. आणि याचा परिणाम म्हणजे समाजामध्ये असंतोष आणि नैराश्य पसरते.
- तांत्रिक बदल आणि जुळवून घेण्याची क्षमता - अलिकडील वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानामुळे कर्मचाऱ्यांची कौशल्य कालबाह्य होण्याचा धोका असतो. ज्यामुळे त्यांना सतत प्रशिक्षण द्यावे लागते.
- सामाजिक आणि सांस्कृतिक अडथळे - भारतात अजनूही जातीय, धार्मिक भेदभाव तसेच लिंग असमानता, अंधश्रद्धा, रुढी परंपरा आणि स्थानिक राजकारण यामुळे मानवी संसाधनाचा पूर्ण वापर होत नाही.
- कामाचा ताण आणि **Burnout** - भारतात कोव्हीड-19 नंतर कर्मचाऱ्यामध्ये कामाचा ताण आणि Burnout ही एक मोठी समस्या बनली आहे. ही समस्या सोडविणे एक आव्हान आहे.
- कायदेशीर आणि नियामक गुंतागुंत - विविध कायदे आणि नियमांमुळे कंपन्यांना कर्मचारी व्यवस्थापनामध्ये अडचणी येतात. त्यामुळे व्यवस्थापन कंपन्यांच्या गरजेनुसार करता येईल असे नाही आणि त्याचा कंपन्याच्या प्रगतीवर परिणाम होतो.
- हिंसाचार आणि सुरक्षिततेची चिंता - NFHS-5 च्या अहवालानुसार 29 टक्के महिलांना घरगुती हिंसाचाराचा सामना करावा लागतो. त्यामुळे अलिकडील बदलत्या परिस्थितीमध्येही महिला सुरक्षित नाहीत. ही समस्या दूर करण्याचे महत्त्वाचे आव्हान आहे.
- हवामान प्रतिरोधक विकासाला चालना देण्याची गरज - UNEP च्या अहवालानुसार भारताचे दरवर्षी हवामान आपत्तीमुळे GDP च्या 1.8 टक्के इतके नुकसान होते. तसेच अजूनही 50 टक्केपेक्षा अधिक

शेतकरी मान्सूनवर अवलंबून आहेत. त्यामुळे हवामान स्मार्ट शेती योजना लागू करणे गरजेचे आहे. तसेच जगातील टॉप 20 प्रदूषित शहरापैकी 14 शहरे भारतात आहेत. हे प्रमाण हवेची गुणवत्ता सुधारून कमी करणे गरजेचे आहे.

- प्रशासकीय पारदर्शकता सुधारणे - भारतातील विविध राज्यातील कमकुवतपणा यामुळे जागतिक भूक निर्देशांकामध्ये भारत 125 देशापैकी 111 व्या क्रमांकावर आहे. हे प्रमाण कमी करणे तसेच वितरण व्यवस्था मनरेगा, PMAY इत्यादीमध्ये लेखापरीक्षण करणे आवश्यक आहेत.

अशी अनेक आव्हाने आहेत. याचा सामना भारत करत आहे. परंतु देशहित विचारात घेऊन एकत्रित प्रयत्न केल्यास एक उज्वल भविष्य निर्माण होऊ शकते.

**समारोप:**

भारतातील मानवी विकास गेल्या काही दशकामध्ये सातत्याने सुधारत आहे. यामध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. आरोग्यविषयक सेवा सुविधांच्यामध्ये वाढ होत आहे आणि सामाजिक कल्याणकारी योजनांच्यावर भर दिला जात आहे. UNDP च्या 2024 च्या मानवी विकास अहवालानुसार भारत 193 देशापैकी 134 व्या क्रमांकावर आहे. भारतातील मानव संसाधन विकास (HRD) सध्या लोकसंख्या शास्त्रीय लाभांश (Demographic Dividend) या टप्प्यामध्ये आहे. ज्यामध्ये तरुण आणि कार्यक्षम लोकसंख्या अधिक आहे. परंतु शिक्षण, आरोग्य आणि कौशल्य विकासातील आव्हाने आहेत. भविष्यातील डिजीटल शिक्षण, व्यावसायिक प्रशिक्षण आणि समावेशक धोरणावर लक्ष केंद्रित करून भारताला जगातील मोठ्या कार्यबलाचे रुपांतर मानवी भांडवलामध्ये करण्याची मोठी संधी आहे. त्यामुळे आर्थिक आणि सामाजिक प्रगती साधता येऊ शकते. जेणेकरून मानवी संसाधन विकासाला चालना मिळू शकते आणि त्यामुळे भारताचा आर्थिक विकास होऊ शकतो.

**संदर्भ ग्रंथ:**

1. मानव संसाधन विकास आणि मानवी हक्क - डॉ. नितीन देशपांडे, अक्षरधारा प्रकाशन, सन 2000.
2. मानव संसाधन व्यवस्थापन - डॉ. दिलीप पाटील, डॉ. चंद्रकांत देवरे, अथर्व पब्लिकेशन, ऑक्टोबर 2022
3. मानव संसाधन विकास - यु. सी. गुप्ता, प्रगती प्रकाशन, पुणे, जानेवारी 2012
4. मानव संसाधन नियोजन आणि विकास - डॉ. अजित मारुती डोके, प्रिती विजयकुमार पाटील, निराली प्रकाशन, ऑगस्ट 2024.
5. मानव संसाधन विकास आणि मानवाधिकार, रंजन कोळंबे, भगीरथ प्रकाशन, 2019.